# Political Science Forum Report - 2021-22

With the aim of making the students of the college aware of the political concepts along with the political events and increasing their active participation in the political process of the state and from that to form the leadership of tomorrow, the political science study board was formed this year as well. The activities carried out by the study board are as follows.

**1) Formation of Forum**

All the students of Political Science were brought together to form the Board of Studies in a democratic manner. Initially Prof. Dr. Nagesh Gaikwad elaborated the role of Political Science Study Board and its role to be formed in a democratic manner. After that, the office bearers of the Board of Political Studies were elected unanimously. All elected office bearers were congratulated. Finally, the newly appointed president of the Political Science Board, Ms. Shital Wagh, a student, expressed her feelings and the program concluded with a show of thanks.

**Political Science Forum (2021-22)**

| | | |
|---|---|---|
| 1) | Ms. Shital Devidas Vagh - | President |
| 2) | Ms. Shital Sanjay Deshmane - | Vice President |
| 3) | Vikas Madan Thutte - | Secretary |
| 4) | Ms. Jayashree Gulabrao Gulve - | Member |
| 5) | Ms. Sandhya Santosh Youngad - | Member |
| 6) | Karthik Anil Jadhav - | Member |
| 7) | Ms. Kiran Suresh Ghadge - | Member |
| 8) | Ms. Priyanka Kumawat - | Member |
| 9) | Ms. Nikita Srikrishna Gaikwad - | Member |
| 10) | Ayan Manna Railiwale - | Member |
| 11) | Shankar Ambadas Ingole - | Member |

**2) Right to Information Workshop (12 October 2021)**

Right to Information Week is organized every year as directed by the government for further dissemination of the Right to Information Act 2005. It is celebrated between 6th to 12th October. In accordance with that, in order to create public awareness of the right to information in our college, through our political science department. A Right to Information workshop was organized on Tuesday 12-10-2021. As the main guide for this workshop, Mr. Prof. Dr. Vilas Tale (Arts College, Buldhana) was present and gave a thorough guide on Information Rights from global background to current status with the help of PPT. This workshop was chaired by Hon. Principal Dr. Subhash Gavane should

take note that while exercising the right to information, it should be done for the benefit of the society without causing any personal loss to anyone. He made a presidential speech expressing this opinion. 53 students participated in this workshop. As technical assistant for this workshop, Prof. Vijay Wakode and Prof. Dr. Performed by Pradeep Barad.



एस.पी.एम.मध्ये माहिती अधिकार कार्यशाळा ऑनलाईन मंडळ

देशोन्नती वृत्तसंकलन...

चिखली ■ शि.मं.प्र. तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालय चिखली जि. बुलडाणा या महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाच्यावतीने माहिती अधिकार सप्ताहाच्या निमित्ताने माहिती अधिकार कार्यशाळेचे आयोजन केले होते.

या कार्यशाळेचे प्रमुख वक्ते प्रा. डॉ. विलास टाले राज्यशास्त्र विभाग, कला महाविद्यालय बुलडाणा हे होते त्यांनी आपले मार्गदर्शन पीपीटीच्या सहाय्याने करत माहिती अधिकाराच्या इतिहासाचा जागतिक आढावा सांगितला व त्यात स्विडन या देशाने माहिती अधिकार कायदा सर्वप्रथम स्विकारला असल्याचे सांगितले.

भारतामध्ये २००५ ला माहिती अधिकार अधिनियम पारित होऊन, त्यातील कलमांवर सविस्तर प्रकाश टाकला. याशिवाय माहिती अधिकाराचा अर्ज कसा करायचा, त्यासाठी कालमर्यादा किती आहे व त्याचे शुल्क व अपील कोठे करायची, कोणते क्षेत्र माहिती अधिकार कक्षेत येत नाही. इत्यादी बाबींवर सखोल मार्गदर्शन केले. यासोबतच या कार्यशाळेचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष गव्हाणे हे होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात माहिती अधिकारामुळे भारतात अनेक भ्रष्टाचाराचे मुद्दे उघडकीस आल्याचे सांगून, आपण माहिती अधिकाराचा गैरप्रकार उघडकीस आणण्यासाठी नक्कीच वापर करावा परंतु त्यात गैरप्रकार टाळावा, असे आवाहन केले.

या कार्यशाळेचे यशस्वी आयोजन तथा संचालन प्रा. डॉ. नागेश गायकवाड राज्यशास्त्र विभाग प्रमुख यांनी केले असून या कार्यशाळेमध्ये सर्व प्राध्यापकवृंद, कार्यालयीन कर्मचारी तथा सर्व विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले. (ता.प्र.)

ePaper देशोन्नती Mon, 18 October 2021
https://deshonnati.digitaledition.ir

**3) Competitive Examination and Political Science (Dated 8 April 2022)**

Nowadays students need guidance to crack competitive exams. In accordance with that, through the Department of Political Science, the former student of the college Mr. Pawan Khillare (passed the examination of Political Science, NET SET and Central Staff Selection) was organized. While guiding him, he said that I myself am 95 percent blind and have passed exams that are considered very difficult. You are an all-round student, so you can crack any exam with ease. But it requires hard work and consistency in studies, if you follow the above mantra in your daily life, success is not far away from you. Also, the president of this program Hon. The principal was Dr. Subhash Gavane who praised Mr. Pawan Khillare on behalf of the college and appealed to the students to follow his example and face such exams. If you study and strive in the right direction, success is near you. Also said. This program was planned and proposed by Prof. Dr. Nagesh Gaikwad, while Ms. Sandhya Yangad and Ms. Shital Deshmane moderated. Prof. Vijay Wakode thanked for this program, while Prof. Dr. Pradeep Bard was also present. On this occasion, 47 students attended the program.




**4) Equality Week Rally (13 April 2022)**

In the Samata Rally, various placards prepared with reference to the Constitution of India were given to the hands of the students. On this occasion, he carried placards with various slogans and announced the slogans on them. In this rally, the principal of the college Dr. Subhash Gavane and Head of Department of Political Science Prof. Dr. Nagesh Gaikwad and all faculty, office staff and students participated in the rally which was held in Chikhli cities.




**coordinator**

**- Prof. Dr. Nagesh Gaikwad**

## सत्र 2021 22

## राज्यशास्त्र अभ्यास मंडळ

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना राजकीय घडामोडी सोबतच राजकीय संकल्पनांची जाणीव व्हावी व राज्यातील राजकीय प्रक्रियेत त्यांचा सक्रिय सहभाग वाढावा आणि त्यातूनच उद्याचे नेतृत्व तयार व्हावे या उद्देशाने दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे गठन करण्यात आले. अभ्यास मंडळाद्वारे राबविलेले उपक्रम पुढीलप्रमाणे आहेत.

1) अभ्यास मंडळ गठण

राज्यशास्त्र विषयाच्या सर्व विद्यार्थ्यांना एकत्र करून लोकशाही पद्धतीने अभ्यास मंडळाचे गठण करण्यात आले. सुरुवातीला प्रा. डॉ. नागेश गायकवाड यांनी राज्यशास्त्र अभ्यास मंडळाची भूमिका व लोकशाही पद्धतीने गठन करावयाची भूमिका विशद केली. त्यानंतर सर्वानुमते राज्यशास्त्र अभ्यास मंडळ पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. निवड झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले. शेवटी राज्यशास्त्र अभ्यास मंडळ नवनियुक्त अध्यक्ष कु.शितल वाघ या विद्यार्थिनीने आपले मनोगत व्यक्त केले व आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

पदाधिकारी (2021-22)

| | | |
|---|---|---|
| १) कु.शितल देवीदास वाघ | - | अध्यक्ष |
| २) कु.शितल संजय देशमाने | - | उपाध्यक्ष |
| ३) विकास मदन थुट्टे | - | सचिव |
| ४) कु.जयश्री गुलाबराव गुळवे | - | सदस्य |
| ५) कु.संध्या संतोष यंगड | - | सदस्य |
| ६) कार्तिक अनिल जाधव | - | सदस्य |
| ७) कु.किरण सुरेश घाडगे | - | सदस्य |
| ८) कु.प्रियंका कुमावत | - | सदस्य |
| ९) कु.निकिता श्रीकृष्ण गायकवाड | - | सदस्य |
| १०) आयान मन्ना रायलीवाले | - | सदस्य |
| ११) शंकर अंबादास इंगोले | - | सदस्य |

2) माहिती अधिकार कार्यशाळा  (दि.१२ ऑक्टोबर २०२१)

माहिती अधिकार अधिनियम 2005 चा अधिक - अधिक प्रसार होण्यासाठी शासनाच्या निर्देशाप्रमाणे दरवर्षी माहिती अधिकार सप्ताह दि. 6 ते 12 ऑक्टोबर या दरम्यान साजरा केला जातो. त्या अनुषंगाने आपल्या महाविद्यालयात सुद्धा माहिती अधिकाराची जनजागृती होण्याच्या दृष्टीने आमच्या राज्यशास्त्र विभागामार्फत दि. 12-10-2021 रोज मंगळवार ला माहिती अधिकार कार्यशाळेचे आयोजन केले होते. या कार्यशाळेला प्रमुख मार्गदर्शक म्हणून मा. प्रा. डॉ. विलास टाले (कला महाविद्यालय, बुलढाणा) हे उपस्थित होते त्यांनी माहिती अधिकारांची जागतिक पार्श्वभूमी पासून तर सद्यस्थिती पर्यंत पीपीटी च्या साह्याने सखोल मार्गदर्शन केले. या कार्यशाळेला अध्यक्ष म्हणून मा. प्राचार्य डॉ. सुभाष गव्हाणे हे होते त्यांनी माहिती अधिकाराचा वापर करताना समाजहितासाठी करावा ज्यातून कोणाचेही वैयक्तिक नुकसान होणार नाही, याची दखल घ्यावी. असे मत व्यक्त करून अध्यक्षीय भाषण केले. या कार्यशाळेला 53 विद्यार्थी सहभागी होते. या कार्यशाळेसाठी तंत्र सहाय्यक म्हणून प्रा. विजय वाकोडे व प्रा. डॉ. प्रदीप  बारड यांनी  कार्य केले.

3) स्पर्धा परीक्षा आणि राज्यशास्त्र  (दि.8 एप्रिल 2022)

सद्यस्थितीत विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेत टिकून राहण्यासाठी मार्गदर्शनाची आवश्यकता आहे. त्या अनुषंगाने राज्यशास्त्र विभागामार्फत महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी श्री पवन खिल्लारे (राज्यशास्त्र ,नेट सेट व केंद्रीय स्टाफ सिलेक्शन ची परीक्षा उत्तीर्ण) यांच्या मार्गदर्शनाचे आयोजन केले होते. त्यांनी आपले मार्गदर्शन करताना म्हटले की मी स्वतः  95 टक्के दृष्टिहीन असून अत्यंत कठीण समजल्या जाणाऱ्या परीक्षा उत्तीर्ण केल्या आहेत. तुम्ही तर संपूर्ण अवयव सक्षम असलेले विद्यार्थी आहात, त्यामुळे तुम्ही कोणतीही परीक्षा अगदी सहज पास करू शकतात. परंतु त्यासाठी आवश्यकता आहे कठोर परिश्रमाची व अभ्यासातील सातत्य पणाची, वरील मूलमंत्र आपल्या दैनंदिन जीवनात पाळला की यश तुमच्यापासून दूर नाही. तसेच या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ.सुभाष गव्हाणे हे होते त्यांनी श्री पवन खिल्लारे यांचे महाविद्यालयाच्या वतीने कौतुक करून विद्यार्थ्यांनी त्यांचा आदर्श घ्यावा व अशा परीक्षांना सामोरे जावे असे आवाहन केले. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास व प्रयत्न केले, तर यश तुमच्या जवळ आहे. असेही सांगितले. या कार्यक्रमाचे नियोजन व प्रस्ताविक प्रा. डॉ. नागेश गायकवाड यांनी, तर सूत्रसंचालन कु.संध्या यंगड व कु.शितल देशमाने यांनी केले. या कार्यक्रमाचे आभार प्रा.विजय वाकोडे यांनी मानले, तर यावेळी मंचावर प्रा. डॉ. प्रदीप बारड हेही उपस्थित होते. याप्रसंगी या कार्यक्रमाला 47 विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

4) समता सप्ताहानिमित्त रॅली (दि. 13 एप्रिल 2022)

समता रॅली मध्ये विद्यार्थ्यांच्या हातात भारतीय संविधानाच्या संदर्भात तयार केलेली विविध फलके देण्यात आली होती. यावेळी विविध घोषवाक्य असलेली फलके घेऊन त्यांनी त्यावरील घोषवाक्या च्या घोषणा दिल्या. या रॅलीमध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष गव्हाणे तसेच राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. नागेश गायकवाड व सर्व प्राध्यापक वृंद कार्यालयीन कर्मचारी तथा विद्यार्थी सहभागी झाले होते ही रॅली चिखली शहरांमध्ये काढण्यात आली होती.

-प्रा.डॉ.नागेश गायकवाड